## <u>निशाणी क्र. १०१ वरील आदेश</u>

सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–६ नियम–१७ प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. दाव्याचे काम प्रलंबित असताना दि. २७.०१.२०२६ रोजी प्रतिवादी यांनी वादी क्र. १ सज्ञान झालेबाबत पुरसिस दाखल केले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे गरजेचे झाले आहे. वादी असे कथन करतात की, दाव्याच्या सरनाम्यामध्ये वादी क्र. १ शिवम आनंद यलमार यांचे वय १२ या अंकास काट मारुन त्याऐवजी १९ असे नमुद करण्यास परवानगी मिळावी तसेच वादी क्र. २ स्वतःकरीता व अ.पा.क. जनक आई म्हणुन हे शब्द वगळण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

३. सदर अर्जास प्रतिवादी यांनी नि.क्र. १०३ कडे म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. ते असे कथन करतात की, वादी क्र. १ हा दि. २०.०७.२०२४ रोजी सज्ञान झालेला आहे. सदरची बाब वादीने न्यायालयापासून दोन वर्षापासून लपवून ठेवलेली आहे. दुरुस्तीची प्रक्रिया मुदतीत पार न केल्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

४. वादी क्र. १ सज्ञान झाला आहे ही बाब प्रतिवादी यांनी नाकरलेली नाही. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्यामध्ये कोणताही बदल होणार नाही. याउलट वादाचे संपुर्ण निराकरण होण्याकरीता सदरची दुरुस्ती गरजेची आहे. त्यामुळे सदरची दुरुस्ती मंजुर होण्यास पात्र आहे. वरील कारणास्तव मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वादींचा अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी विहीत कालावधीत अर्जात नमुद केल्याप्रमाणे योग्य ती दुरुस्ती करावी व तशी दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी

PRIYANKA RAMESH PATIL

Digitally signed by PRIYANKA RAMESH PATIL
Date: 2026.02.24 13:42:13 +0530

(पी.आर.पाटील)

दिनांक – २४.०२.२०२६

५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पंढरपूर